अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## स्पेनचा अमेरिकेला कडक इशारा

**नवी दिल्ली :** माद्रिद-इराणने आखाती देशांमधील अमेरिकेच्या अनेक सैनिकी तळांना लक्ष्य केले आहे. त्यामुळे आखाती देश सावध झाले आहेत. एकीकडे इराणने अमेरिकेच्या तळांवर हल्ल्याचा धडाका सुरुच ठेवलेला असताना स्पेननं डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाला दणका दिला आहे.

आमच्या सैन्य तळांचा वापर इराणवर हल्ला करण्यासाठी करु देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका स्पेनने घेतली आहे. स्पेनच्या मोरॉन आणि रोटामध्ये अमेरिकेसोबत स्पेनचे संयुक्त सैन्य तळ आहेत. स्पेनने कठोर भूमिका घेत थेट अमेरिकेला इशारा दिला आहे. त्यामुळे अमेरिकेला १५ लढाऊ विमाने स्पेनच्या तळांवरुन जर्मनी आणि फ्रान्सला न्यावी लागली. त्यामुळे ऐन युद्धात अमेरिकेला नामुष्की सहन करावी लागली.

स्पेन आपल्या सैन्य तळांचा वापर इराणवर हल्ले करण्यासाठी होऊ देणार नाही. आम्ही अमेरिकेला परवानगी देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका स्पेनचे परराष्ट्र मंत्री जोसे मॅन्युएल अल्बारेस यांनी घेतली आहे. आम्ही अमेरिकेसोबत सैन्य तळ उभारले आहेत. दोन देश मिळून सैन्य तळ चालवतात. पण सैन्य तळ स्पेनच्या सार्वभौमत्वाखाली येतात. स्पेनने याआधीच इराणवरील हल्ल्यांचा निषेध केलेला आहे, याची आठवण करुन देत अल्बारेस यांनी करुन दिली. स्पेननं अमेरिकेला सैन्य तळ वापरु न देण्याची भूमिका घेत ताठ कणा दाखवल्याची चर्चा जगभरात सुरु आहे.

www.surajyadigital.com । बुधवार, दि. ४ मार्च २०२६ । वर्ष : २४ वे अंक : १५४ वा किंमत : ५ रुपये पाने १२

# ‘नो’ एन्ट्रीच्या नावाखाली ‘नो इमानी’, रोख वसुली, चलनही ‘जोमा’नी!

पंढरपूर/प्रतिनिधी

**गोरगरीबांचे आराध्य दैवत असलेल्या पंढरी नगरीत कायद्याचे रक्षकच भक्षक बनल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. कोल्हापूर रस्त्यावरून शहरात येताना सांगोला चौकात एका १६ चाकी ट्रक चालकाला ‘नो-एन्ट्री’चे कारण सांगत अडवण्यात आले. सेटलमेंट म्हणून सुरुवातीला दोन हजार रोख घेतले त्यानंतर मागून हजाराचे चलान पाठवले. आक्रमक ट्रक चालकाने रस्त्यावर गाडी आडवी लावून ठिय्या मांडत या प्रकरणाचा जाब विचारला. त्यावेळी त्याची गच्ची पकडून त्यालाच उलट पोलिसांनी आपल्या खाक्या दाखवला. रस्त्याच्या दूतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या. प्रचंड गोंधळ निर्माण झाला. सोमवार (ता.२) रात्री दक्षिण काशी पंढरपुरात ही घटना घडली.**

## ट्रक चालकांनं गाडी आडवी लावून रस्त्यावर मांडला ठिय्या

## वाहतूक रोखली, रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा

### ‘खाकी’वर्दीला ला क्लीन ‘चिट’ मिळणार की सस्पेन्शनची ‘चिट्ठी’?

या प्रकरणात निष्पक्ष चौकशी आणि कडक कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. मात्र या प्रकरणात कारवाईच्या पार्श्वभूमीवर, ‘खाकी’वर्दीला क्लीनचिट मिळकणार की सस्पेन्शनची चिट्ठी? याबद्दल पंढरपूर शहरात चर्चा सुरु आहे.

### पोलीस निरीक्षकांनी भाष्य टाळलं, विधानसभेत उठणार आवाज



पंढरपूरचे पो. नि. दशरथ वाघमोडे यांनी मात्र चालकाने नो एन्ट्रीचे उल्लंघन केल्याने नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आणि पावतीही देण्यात आल्याचा दावा केला आहे. मारहाणीच्या आरोपांबाबत त्यांनी भाष्य करण्याचे टाळले आहे. दरम्यान, हा मुद्दा सुरू असलेल्या अधिवेशनात मांडणार असल्याचा दावा आमदार राजू खरे यांनी केला आहे. या संपूर्ण घटनेमुळे पंढरपूरमध्ये पोलिसांच्या कारवाईवरून नव्याने वाद निर्माण झाला असून पुढील चौकशीकडे लक्ष लागले आहे.



पंढरपूर : सांगोला चौक येथे ट्रक चालकाची गच्ची पकडताना पोलिस कर्मचारी. दुसऱ्या छायाचित्रात पाठीवर मारल्याच्या खुणा दाखवताना ट्रक चालक व उपस्थित मोठा जनसमुदाय.

पंढरपूर शहरातून जड वाहतुकीला बंदी असताना मोठ्या प्रमाणात जड वाहतूक होताना दिसून येत असून त्यामुळे शहरातील अनेक वर्दळीचे रस्ते अपघात क्षेत्र झाल्याचे दिसून येत आहे आणि यातूनच वाहतूक शाखेकडून शहरातील जड वाहतुकीवर कारवाईही होताना दिसून येत आहे. वाहतूक शाखेकडून शहरातून जड वाहतूक करणाऱ्या वाहनावर दंडात्मक कारवाई होताना दिसून येत आहे.

मात्र सोमवारी वाहतूक शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्यांने ‘डब्बल’दंड वसूल केल्याचा आरोप करत गोपाळपूर रस्त्यावर एका १६ चाकी ट्रक चालकाने थेट ट्रक रस्त्यावर आडवा लावून वाहतूक शाखेने केलेल्या कारवाई विरोधात

(अधिक वृत्त पान ७ वर...)

### प्रश्न मात्र कायम... कायद्याचे रक्षक जर ‘भक्षक’ बनले, तर न्याय कुणाकडे मागायचा?

‘खाकी’वर्दीकडून ट्रक चालकास मारहाण झाली. कायद्याचे रक्षण करणाऱ्या पंढपुरातील पोलिसांनी मारहाणीचा प्रकार केल्याचा आरोप आहे. रोख पैसे घेऊनदेखील दंडाचे चालान फाडले. यावर विचारायला गेलेल्या ट्रक चालकास मारहाण केली. कायद्याचे रक्षकच भक्षक बनल्याची चर्चा पंढरपूर शहरात सुरु आहे. तथापि याप्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्णयाकडे लक्ष लागून राहिले आहे.

# महायुद्धच

- आशिया खंडासाठी ‘रेड अलर्ट’
- इराणची अणुउर्जा ‘रडावर’
- स्पेन-कुवेतचा ट्रम्पला दणका

लंडन



अमेरिका-इस्वायल यांच्याकडून सलग चौथ्या दिवशीही इराणवर बॉम्ब हल्ले सुरूच आहेत.त्याता इराणकडूनही त्याच ताकतीने त्या दोनही देशांवर प्रतिहल्ले सुरू आहेत तसेच इराणच्या सैन्यांकडून गोल्फ प्रदेशातील देशांवर मिसाईल हल्ले सुरूच आहेत.वाढत्या हल्ल्यांच्या भीतीने आखाती देशांमधील लोक पलायन करत आहेत..त्यामुळे आता या संघर्षाने उग्र रूप घेतल्याचे दिसत आहे. युरोप खंडातील तीन देशांनी अमेरिकेच्या मागे ताकत लावली आहे तर स्पेनने आमच्या तळावरून इराणवर हल्ला करायचा नाही,अशा स्पष्ट शब्दात बजावून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड टम्प यांना दणका दिला आहे. या संषर्घाला महायुद्धाचे स्वरूप आले आहे.

रॉयल एअर फोर्सच्या तळावर इराणच्या ड्रोनने हल्ला केल्यानंतर ब्रिटनने युद्धादरम्यान अमेरिकेला त्यांच्या लष्करी तळांचा वापर करू देणार असे सांगितले आहे तसेच इराणकडून होणारे प्रतिहल्ले थांबवण्यासाठी अमेरिका आणि तिच्या भागीदारांबरोबर काम करण्यास आम्ही तयार असल्याची भूमिका फ्रान्स आणि जर्मनीकडून घेण्यात आली आहे. त्यामुळे इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील

(अधिक वृत्त पान ७ वर...)

ICC MEN'S T20 WORLD CUP

**आजचा सामना**

**दक्षिण आफ्रिका v/s न्यूझीलंड**

स्थळ : कोलकाता

वेळ : सायंकाळी ७ वाजता

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



रस्त्यांच्या दुर्दशेमुळे रोजच ‘धुळवड’ असते !

| कल्याण |
| --- |
| 289-94-680 |

| मुंबई |
| --- |
| 158-43-229 |

0 3 2

## संगीतबारी थिएटर मालकीणीच्या घरी सिनेस्टाईल थरार धमकावण्यासाठी संशयितांनी रोखले पिस्तुल आणि सुरा

# पाठलाग केला, परत घरात घुसून धमकावलं, धाराशिवच्या कलाकेंद्रावर सशस्त्र दरोडा

- नऊ लाख लंपास
- येरमाळा परिसरात खळबळ
- दरोड्याच्या घटनेपूर्वीच्या भांडणाची किनार

धाराशिव/प्रतिनिधी

सुरुवातीला संशयित दरोडेखोरांनी गाडीचा पाठलाग केला. मात्र हाती काहीच लागलं नाही. तो प्रयत्न फसला. त्यानंतर मोठ्या धाडसानं त्यांनी घरात घुसून धमकावलं. सशस्त्र दरोड टाकत ९ लाख लंपास केले. धाराशिवच्या कला केंद्रात हा प्रकार घडला. पहाटेच्या दरम्यान हा सिनेस्टाईल थरार घडला.

धाराशिव येथे कालिका सांस्कृतिक लोकनाट्य कलाकेंद्राच्या संचालिकांच्या घरी

(अधिक वृत्त पान ७ वर...)




### ९.५१ लाखांची चोरी

आरोपींनी निर्मला जाधव आणि रेखा शिंदे यांच्या अंगावरील सुमारे १२१.६०० ग्रॅम वजनाचे अंदाजे ६ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, चार मोबाईल फोन सुमारे ३ लाख ४९ हजार रुपये किंमतचे तसेच सीसीटीव्ही डीव्हीआर असा एकूण ९ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

### पोलिसांची तपासाची दिशा

घटनेची माहिती मिळताच येरमाळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे. संबंधित आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### नेमकं काय घडलं?

निर्मला जाधव यांच्या तक्रारीनुसार, रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास त्या, रेखा शिंदे, शिवम गंगावणे आणि चालक शशिकांत मुंडे हे बार्शी येथील कलाकेंद्र बंद करून इनोव्हा कारने चोराखळी येथे परतत होते. त्यावेळी एका चारचाकी वाहनाने पाठलाग केल्याचा संशय त्यांना आला. पहाटे साडेपाचच्या सुमारास त्या घरी पोहोचल्या असता घराचे दार उघडे असतानाच तोंडाला कापड बांधलेले सहाजण आत घुसले.दोघांनी शिवम गंगावणे याला जमिनीवर दाबून धरले तर एकाने निर्मला जाधव यांच्या डोक्याला पिस्तूल लावले. दुसऱ्या आरोपीने रेखा शिंदे यांच्या गळ्याला लोखंडी सुरा लावून धमकावले. आरडाओरड थांबवण्यासाठी आरोपींनी तिघांच्या डोळ्यांत चटणी टाकून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# मिनी मंत्रालयाचा कारभारी १८ मार्चला ठरणार

## ११ पं. स. सभापतींची निवड १२ तारखेला

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची १८ मार्च रोजी निवड केली जाणार आहे. जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांचे सभापती आणि उपसभापतींची निवड ही १२ मार्च रोजी केली जाणार आहे. या निवडीसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अकरा अध्यासी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान कारभारी निवडीच्या पार्श्वभूमीवर, पडद्यामागे खूप काही शिजत असल्याची माहिती मिळत आहे. पदाचं सिंहासन मिळवण्यासाठी इच्छुकांकडून गॉडफादरांच्या मनधरणीचे प्रयत्न सुरु आहेत. त्याशिवाय जिल्हाध्यक्ष आणि सभापतीपदावर नेमकी कोणाची निवड होणार? यावरुन कार्यकर्त्यांमध्ये पैजा लागत आहेत.

सोलापूर जिल्हा परिषद आणि ११ पंचायत समित्यांचा निकाल ९ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आला आहे. अकरापैकी सात पंचायत समितींवर भारतीय जनता पक्षाने निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे. तसेच इतरही ठिकाणी आपल्याच पक्षाचा सभापती बसविण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली डावपेच आखले जात आहेत, त्यामुळे सभापती निवडीकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष असणार आहे.

दरम्यान, पंचायत समिती सभापती आणि उपसभातींची निवडी १२ मार्च रोजी होणार असून त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून अकरा जणांवर विशेष जबाबदारी देण्यात आली आहे. त्यात करमाळ्यासाठी

(अधिक वृत्त पान ७ वर...)



- जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडून पीठासन अधिकारी नियुक्त
- कारभारी निवडीच्या पार्श्वभूमीवर, पडद्यामागे शिजतंय खूप
- इच्छुकांकडून गॉडफादरांच्या मनधरणीचे प्रयत्न
- निवडीवरुन कार्यकर्त्यांमध्ये लागलेल्या पैजा

### हात उंचावून मतदान

पंचायत समित्यांच्या सभापती-उपसभापतींची निवड ही बहुमताने निवड होते. सदस्यांनी हात उंचावून मतदान करायचे आहे. ज्या उमेदवाराच्या बाजूने सर्वाधिक मतदान, तो सदस्य सभापती आणि उपसभापती होईल. जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्षांची निवडही अशाच पद्धतीने होणार आहे, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### जि.प. पक्षीय बलाबल

| एकूण जागा | ६८ |
| --- | --- |
| भाजप | ३८ |
| राष्ट्रवादी अजित पवार | ११ |
| राष्ट्रवादी शरद पवार | ५ |
| शिवसेना (शिंदे गट) | ८ |
| शेकाप | ३ |
| करमाळा स्थानिक आघाडी | २ |
| तीर्थक्षेत्र विकास आघाडी | १ |

### ११ पंचायत समित्यांमधील पक्षीय बलाबल

**भाजप :** ०७ (अक्कलकोट, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, माढा, मोहोळ, मंगळवेढा)

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष :** ०१ (माळशिरस)

**भाजप-राष्ट्रवादी युती :** ०१ (करमाळा)

**सांगोला तालुका विकास आघाडी :** ०१ (सांगोला)

**समान संख्याबळ (पंढरपूर) : राष्ट्रवादी काँग्रेस** : ०८, भाजप : ०८